महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४३५६/४१०/४९२

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/२०२६/कॅप फेरी/३२६ दिनांक : ०२/०७/२०२६

## प्रवेशासाठीचे वेळापत्रक
## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका
## अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता तीन वर्ष कालावधीच्या, पुर्णवेळ पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे आणि अर्ज निश्चित करणे त्याचबरोबर विकल्प अर्ज भरुन निश्चित करणे, कॅप जागा वाटप, झालेले जागा वाटप स्वीकारण्यापूर्वी स्वत: पडताळणी करणे, जागा वाटप स्वीकारणे, जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उमेदवारांनी उपस्थित राहणे या प्रक्रियेच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि तारखा खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | प्रक्रिया | वेळापत्रक | |
|---|---|---|---|
| | | सुरुवात तारीख | सुधारित अंतिम तारीख |
| १. | प्रवेशप्रक्रियेसाठी उमेदवारांद्वारे संकेतस्थळावरुन अर्ज छाननीची योग्य पद्धत (ई-स्क्रूटनी / प्रत्यक्ष स्क्रूटनी) निवड करुन ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे. (महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी) | २०-०५-२०२६ | ०६*-०७-२०२६ |
| २. | प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चिती करणे (ई-स्क्रूटनी / प्रत्यक्ष स्क्रूटनी) | २०-०५-२०२६ | ०६*-०७-२०२६ |
| * प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरू ठेवल्या जातील. दि. ०६-०७-२०२६ नंतर ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पद्धतीद्वारे नोंद होणारे, पडताळणी व निश्चित होणारे अर्ज संस्था स्तरावरील व कॅपव्यतिरिक्त जागांसाठीच विचारात घेतले जातील. | | | |
| ३. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे. | ०७-०७-२०२६ | |
| ४. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी तात्पुरत्या गुणवत्ता याद्यामध्ये तक्रार, असल्यास त्या सादर करणे | ०८-०७-२०२६ | ०९-०७-२०२६ |
| ५. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे. | १०-०७-२०२६ | |

टिप:

१. ऑनलाईन अर्ज भरणे व निश्चित करणे याकरिता उमेदवारांच्या सोयीनुसार “ई-स्क्रूटनी” व “प्रत्यक्ष स्क्रूटनी” छाननी पद्धतीची माहिती, प्रवेशासाठीचे पात्रतेचे निकष, अर्ज भरण्यासाठीचे शुल्क, उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना इत्यादी सर्व बाबी संचालनालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/२०२६/१८८, दिनांक : १५/०५/२०२६ च्या प्रवेशासाठीच्या परिपत्रकानुसार राहतील.

२. कॅप फेरींमध्ये मुख्यत्वे चार टप्पे आहेत. (क) विकल्प नमुना भरणे (ख) जागावाटप (ग) जागा स्वीकृती करणे व काही त्रुटी असल्यास त्यामध्ये सुधारणा करणे (घ) संस्थेमध्ये उपस्थित राहणे.
जागा वाटपानंतर उमेदवाराने खाली दिलेल्या सूचनांनुसार जागा स्विकृतीची प्रक्रिया पार पाडावी.

- उमेदवाराने त्याच्या अर्जात नमुद केलेले पात्रता गुण, श्रेणी, लिंग, आरक्षण, इतर आरक्षण इत्यादींशी संबंधित दावे आणि त्याच्या समर्थनार्थ अपलोड केलेली कागदपत्रे सत्य आणि अचुक असल्याची स्वयं-पडताळणी/प्रमाणीकरण करून लॉगिनद्वारे फ्रीझ किंवा नॉट फ्रीझ (बेटरमेंट) पर्याय निवडून वाटप केलेली जागा स्वीकारावी आणि ऑनलाइन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.
- जर उमेदवारास/संस्थेस असे निदर्शनास आले की, अर्ज भरताना त्याने पूर्वी केलेला दावा चुकीचा आहे, तर उमेदवाराने अशा त्रुटी दुरुस्त कराव्यात. (माहिती पुस्तिकेत दिलेल्या नियम (९) पोट-नियम (४) च्या खंड (ङ) नुसार चुका दुरुस्त करण्याचे प्रयोजन नमुद आहे.) अशा उमेदवाराने ई-स्क्रूटनी किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पद्धतीद्वारे त्यांच्या लॉगिनद्वारे या संदर्भात हरकत नोंदवावी.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी १ | | | |
|---|---|---|---|
| अनु.क्र | प्रक्रिया | सुरुवात तारीख | अंतिम तारीख |
| १. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा (जागांची रचना) प्रदर्शित करणे. | १०-०७-२०२६ | |
| २. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | ११-०७-२०२६ | १३-०७-२०२६ |
| ३. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | १५-०७-२०२६ | |
| ४. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>क) ज्या उमेदवारास पहिल्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाच्या जागेचे (ऑटोफ्रीझ) वाटप झाले असेल, अशा उमेदवारांनी वाटप झालेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे. असे उमेदवार जागा स्विकारतील व जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.<br>ख) ज्या उमेदवारास पहिल्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झालेले आहे व या जागावाटपाने तो समाधानी असेल आणि त्याला जागा गोठवायची (फ्रीझ) इच्छा असल्यास असे उमेदवार वाटप झालेली जागा स्विकारतील व जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.[उमेदवाराने हा पर्याय काळजीपूर्वक वापरला पाहिजे]<br>ग) ज्या उमेदवारांना त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झाले आहे व जे उमेदवार पुढील फेरींमध्ये वरच्या पसंतीक्रमाची जागा मिळविण्याकरिता सहभागी होण्यास इच्छुक असतील अशा उमेदवारांनी पहिल्या फेरीमध्ये मिळालेल्या जागेचा "नॉट फ्रीझ"(बेटरमेंट) पर्याय निवडून स्वीकार करणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. | १६-०७-२०२६ | १८-०७-२०२६ |
| ५. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>टिप:<br>क) उपरोक्त ४ (क) व ४ (ख) नुसार जागा स्वीकारलेल्या उमेदवारांनी प्रवेशाच्या निश्चितीकरणासाठी जागावाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.<br>ख) संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारास प्रवेशाच्या पुष्ठीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती व शुल्क भरल्याची पावती देईल. जर संस्थेला , उमेदवाराच्या अर्जाच्या नमुन्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळल्यास संस्थेने अशा उमेदवाराचा प्रवेश निश्चित करू नये आणि अशा उमेदवाराने माहिती अद्ययावत करण्यासाठी त्याच्या लॉगिनमधून ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे हरकत नोंदवावी. | १६-०७-२०२६ | १८-०७-२०२६ |
| केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी २ | | | |
| ६. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे. | १९-०७-२०२६ | |
| ७. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | २०-०७-२०२६ | २१-०७-२०२६ |
| ८. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | २३-०७-२०२६ | |
| ९. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>टिप:<br>क) दुसऱ्या फेरीत सहभागी झालेल्या आणि दुसऱ्या फेरीत पहिल्यांदाच जागा वाटप झालेल्या सर्व पात्र उमेदवारांनी जागा स्वीकारावी आणि ऑनलाइन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.<br>ख) ज्या उमेदवारास दुसऱ्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या पसंतीक्रमापैकी एका पसंतीक्रमांकाच्या जागेचे (ऑटोफ्रीझ) वाटप झाले असेल, अशा उमेदवारांनी वाटप झालेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे. असे उमेदवार जागा स्विकारतील व जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील. | २४-०७-२०२६ | २५-०७-२०२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ग) ज्या उमेदवारास दुसऱ्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या पसंतीक्रमांखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झालेले आहे व या जागावाटपाने तो समाधानी असेल आणि त्याला जागा गोठवायची (फ्रीझ) इच्छा असल्यास असे उमेदवार वाटप झालेली जागा स्विकारतील व जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.[उमेदवाराने हा पर्याय काळजीपूर्वक वापरला पाहिजे]<br>घ) ज्या उमेदवारांना त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झाले आहे व जे उमेदवार पुढील फेरीमध्ये वरच्या पसंतीक्रमाची जागा मिळविण्याकरिता सहभागी होण्यास इच्छुक असतील अशा उमेदवारांनी दुसऱ्या फेरीमध्ये मिळालेल्या जागेचा "नॉट फ्रीझ"(बेटरमेंट) पर्याय निवडून स्वीकार करणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. | | |
| १०. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>टिप:<br>क) उपरोक्त ९ (ख) व ९ (ग) नुसार जागा स्वीकारलेल्या उमेदवारांनी प्रवेशाच्या निश्चितीकरणासाठी जागावाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.<br>ख) संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारास प्रवेशाच्या पुष्टीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती व शुल्क भरल्याची पावती देईल. जर संस्थेला, उमेदवाराच्या अर्जाच्या नमुन्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळल्यास संस्थेने अशा उमेदवाराचा प्रवेश निश्चित करू नये आणि अशा उमेदवाराने माहिती अद्ययावत करण्यासाठी त्याच्या लॉगिनमधून ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे हरकत नोंदवावी. | २४-०७-२०२६ | २५-०७-२०२६ |
| | **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी ३** | | |
| ११. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे. | २६-०७-२०२६ | |
| १२. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | २७-०७-२०२६ | २८-०७-२०२६ |
| १३. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | ३०-०७-२०२६ | |
| १४. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>टिप:<br>क) तिसऱ्या फेरीत सहभागी झालेल्या आणि तिसऱ्या फेरीत पहिल्यांदाच जागा वाटप झालेल्या सर्व पात्र उमेदवारांनी जागा स्वीकारावी आणि ऑनलाइन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.<br>ख) ज्या उमेदवारास तिसऱ्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या सहा क्रमांकाच्या पसंतीक्रमापैकी एका पसंतीक्रमांकाच्या जागेचे (ऑटोफ्रीझ) वाटप झाले असेल, अशा उमेदवारांनी वाटप झालेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे. असे उमेदवार जागा स्विकारतील व जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.<br>ग) ज्या उमेदवारास तिसऱ्या कॅप फेरीमध्ये त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या सहा क्रमांकाच्या पसंतीक्रमाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झालेले आहे व या जागावाटपाने तो समाधानी असेल आणि त्याला जागा गोठवायची (फ्रीझ) इच्छा असल्यास असे उमेदवार वाटप झालेली जागा स्विकारतील व जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील.[उमेदवाराने हा पर्याय काळजीपूर्वक वापरला पाहिजे]<br>घ) ज्या उमेदवारांना त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या सहा क्रमांकाच्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकाच्या जागेचे वाटप झाले आहे व जे उमेदवार पुढील फेरीमध्ये वरच्या पसंतीक्रमाची जागा मिळविण्याकरिता सहभागी होण्यास इच्छुक असतील अशा उमेदवारांनी तिसऱ्या फेरीमध्ये मिळालेल्या जागेचा "नॉट फ्रीझ"(बेटरमेंट) पर्याय निवडून स्वीकार करणे आवश्यक आहे व असे उमेदवार जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करतील. | ३१-०७-२०२६ | ०१-०८-२०२६ |
| १५. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>टिप:<br>क) उपरोक्त १४ (ख) व १४ (ग) नुसार जागा स्वीकारलेल्या उमेदवारांनी प्रवेशाच्या निश्चितीकरणासाठी जागावाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे. | ३१-०७-२०२६ | ०१-०८-२०२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ख) संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारास प्रवेशाच्या पुष्टीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती व शुल्क भरल्याची पावती देईल. जर संस्थेला , उमेदवाराच्या अर्जाच्या नमुन्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळल्यास संस्थेने अशा उमेदवाराचा प्रवेश निश्चित करू नये आणि अशा उमेदवाराने माहिती अद्ययावत करण्यासाठी त्याच्या लॉगिनमधून ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे हरकत नोंदवावी. | | |
| | **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी ४** | | |
| १६. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चौथ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे. | ०२-०८-२०२६ | |
| १७. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चौथ्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | ०३-०८-२०२६ | ०४-०८-२०२६ |
| १८. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चौथ्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | ०६-०८-२०२६ | |
| १९. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चौथ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>टिप: चौथ्या फेरीत सहभागी झालेल्या आणि चौथ्या फेरीत पहिल्यांदाच जागा वाटप झालेल्या सर्व पात्र उमेदवारांनी जागा स्वीकारावी आणि ऑनलाइन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे. | ०७-०८-२०२६ | ०८-०८-२०२६ |
| २०. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चौथ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>टिप: चौथ्या फेरीमध्ये पात्र उमेदवारांपैकी ज्या उमेदवारास प्रथमच जागावाटप करण्यात आले आहे किंवा जागा वाटपात सुधारणा झाली आहे किंवा या फेरीमध्ये जागा वाटपात सुधारणा झाली नाही / आधीची वाटप केलेली जागा, असे जागावाटप अंतिम असेल. प्रवेशाच्या पुष्टीकरणासाठी अशा उमेदवारांनी वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे. | ०७-०८-२०२६ | ०८-०८-२०२६ |

***

| | | | |
|---|---|---|---|
| **संस्थास्तरीय कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश ( प्रवेशप्रक्रियेच्या नियम क्र. १३ व १५ चे अवलोकन करावे)** | | | |
| १. | संस्थास्तरीय कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठी अर्ज सादर करणे.-<br>क) प्रत्येक संस्थने, प्रवेशाचे वेळापत्रक आणि संस्थेद्वारे प्रत्येक पाठयक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर अधिसूचित करावी व आवेदनपत्र मागवावेत.<br>ख) जर उमेदवार संबंधित संस्थेत थेट अर्ज सादर करू शकला नाही, तर तो/ती https://poly26.dtemaharashtra.gov.in/ या संकेतस्थळाद्वारे संस्था स्तरावर प्रवेशासाठी सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करू शकेल. अशा उमेदवारांचे अर्ज संबंधित संस्थांना ०७-०८-२०२६ पर्यंत संस्थेच्या लॉगिनमध्ये पाठवले जातील. | ... | ०७-०८-२०२६ |
| २. | संचालनालयाकडुन प्राप्त होणा-या तसेच संस्थेकडे प्राप्त अर्जाची गुणवत्ता यादी नियम क्र. १३ नुसार प्रसिद्ध करणे तसेच रिक्त जागांची यादी संस्थेने प्रसिद्ध करणे. | (संस्थेद्वारे घोषित केले जाईल) | |
| ३. | अनुक्रमांक २ नुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार संस्थास्तरीय कोटयातील / केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश.-<br>• संचालनालयाद्वारे संस्थेच्या लॉगिन मध्ये प्राप्त होणारी माहिती व संस्थेकडे उमेदवारांकडून प्राप्त होणारे अर्ज यांची गुणवता यादी संस्थेद्वारे तयार करण्यात येऊन संस्था पूर्ण शुल्क परताव्याचा प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत या जागांवर नियम क्र. १३ व १५ नुसार प्रवेश करावेत.<br>• जर उमेदवाराने पूर्वी प्रवेशित संस्थेमधील जागा रद्द करून, नव्याने प्रवेश निश्चित केला तर, ज्या संस्थेतून प्रवेश रद्द केला आहे ती संस्था उमेदवारास एक हजार रुपये वजा करून पूर्ण शुल्क परत करेल. [माहिती पुस्तिकेमधील नियम क्र. १५ (क) व १५ (ग)] | ०९-०८-२०२६ | १२-०८-२०२६ |
| ४. | अनुक्रमांक ३ नुसार प्रवेश प्रक्रिया पार पाडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश.-<br>• उपरोक्त ३ मध्ये नमुद केल्यानुसार प्रक्रिया पार पाडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर दि. १३-०८-२०२६/दि. १४-०८-२०२६ पर्यंत प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर नोंदणी करणा-या व अर्ज निश्चित करण्या-या व संस्थेकडे अर्ज सादर करणा-या उमेदवारांचे प्रवेश नियम क्र. १३ नुसार संस्थांनी करावेत. (संचालनालयाकडुन संस्थेच्या लॉगिनमध्ये नव्याने कोणतीही यादी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.)<br>• या कालावधीत, जर उमेदवाराने पूर्वी प्रवेशित संस्थेमधील जागा रद्द करून, नव्याने प्रवेश निश्चित केला, तर ज्या संस्थेतून प्रवेश रद्द केला आहे त्या संस्थेकडून सुरक्षा ठेव | १३-०८-२०२६ | १४-०८-२०२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | आणि सावधता रक्कम वगळता उमेदवाराला त्याच्या कोणत्याही शुल्काचा परतावा मिळणार नाही. [माहिती पुस्तिकेमधील नियम क्र. १५ (ख) व १५ (ग)] | | |

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण शुल्क परताव्याचा प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांक | १२-०८-२०२६ |
| २. | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक | १४-०८-२०२६ |
| ३. | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | १४-०८-२०२६ |

महत्वाची टीप: -

१. अंतिम गुणवत्ता यादीमध्ये ज्यांची नावे नोंदली गेली आहेत अशा सर्व प्रकारच्या उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (कॅपद्वारे) प्रवेशासाठी विचारात घेतले जाईल.

२. संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

<u>उमेदवारांना महत्वाच्या सूचना:</u>

१. एकदा उमेदवाराने संबंधित प्रवेश फेऱ्यांसाठी त्याच्या/तिच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन विकल्प अर्जाची निश्चिती केली की, उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत सादर केलेला पर्याय / प्राधान्य बदल करण्याची / रद्द करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२. संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या जागा वाटपाच्या यादीमध्ये, उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी व्यक्तिश: कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना जागावाटप पत्रे पाठविली जाणार नाहीत.

३. ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल अशा उमेदवारांनी "तात्पुरते जागावाटप पत्र" संकेतस्थळावरुन त्याच्या लॉगइन मधून डाऊनलोड करुन घ्यावे.

४. सर्व उमेदवारांसाठी जागा-स्वीकृती शुल्क ₹१,०००/- (रुपये एक हजार फक्त) एवढे आहे. उमेदवाराला जागावाटपानंतर कागदपत्रांच्या पहिल्या स्वयं-पडताळणी दरम्यान जागा-स्वीकृती शुल्क भरावे लागते. हे शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क आहे. उमेदवारांना जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करावे लागेल.

५. उमेदवार संस्थेत प्रवेश घेण्यासाठी हजर होण्याच्या वेळेस, अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवार अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मूळ प्रमाणपत्र सादर करणार नाही अशा परिस्थितीत जागावाटप आपोआप रद्द होईल व ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल. अधिसूचित वेळापत्रकानुसार कागदपत्रांच्या स्वयं-पडताळणीच्या टप्प्यावर उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

६. नंतरच्या टप्प्यात, उमेदवाराने अर्जात केलेल्या खोट्या दाव्यांवरून उमेदवाराला जागावाटप झालेले आहे असे आढळल्यास, असे जागावाटप/संस्थेमध्ये घेतलेला प्रवेश आपोआप रद्द होईल.

७. ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.

८. राखीव प्रवर्गाचे उमेदवार म्हणून नोंदणी केलेले परंतु ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या कागदपत्रांच्या पडताळणीच्या टप्प्यात, राखीव प्रवर्गाच्या दाव्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ असलेल्या उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार समजले जाईल व त्याना ₹१०० /- चे शुल्क फरकाची रक्कम फक्त ऑनलाईन पद्धतीने भरावे लागेल.

९. तक्रार/हरकत नोंदविण्यासाठी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडणारे उमेदवारांना सुविधा केंद्रावर कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील.

## सर्वसाधारण टिप:

१. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात.

२. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

३. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

४. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते **https://poly26.dtemaharashtra.gov.in/** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

५. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत .

६. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

७. मदतकक्ष क्रमांक **+91 7249724418** सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई